# बीड जिल्ह्यातील बहुतांश ठाणेदार बदलणार; फिल्डिंग लावून बसलेल्यांनाही कंट्रोल केले जाणार?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७९ ■ मंगळवार दि.१८ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 179 ■ Tuesday Dt. 18 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4



# वाल्मिक कराडच्या मर्जीतले पोलिस अधिकारी कारवाईच्या रडारवर!

## वाल्मिक कराडला अगोदर सेल्युट मारणाऱ्या पोलिस ठाणेदारांची उचलबांगडी लवकरच?

बीड । प्रतिनिधी

पोलिस ठाण्याचा प्रभारी अधिकारी होण्यासाठी अनेक सहायक पोलिस निरीक्षक, पोलिस निरीक्षक हे राजकीय नेते, मंत्री, आमदार, खासदारांसह इतर लोकांच्या माध्यमातून 'फिल्डिंग' लावत असतात. आतापर्यंत याचा 'फायदा'ही अनेकांना झाला, परंतु आता तसे चालणार नाही. ज्यांच्यात गुणवत्ता आहे, अशांनाच ठाणेदार म्हणून नियुक्ती दिली जाणार आहे. पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मे महिन्यात जिल्ह्यातील बहुतांश ठाणेदार बदलणार आहेत. यात 'फिल्डिंग' लावून बसलेल्यांनाही 'कंट्रोल' केले जाणार आहे.

जिल्ह्यात सायबरसह २९ पोलिस ठाणे आहेत. परंतु, मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील कायदा व सुव्यस्था आणि राजकीय नेत्यांकडून होत असलेले आरोप पाहता १०७ अधिकाऱ्यांनी बीडच्या बाहेर बदली करण्यासाठी विनंती केली आहे. यात पोलिस उपनिरीक्षक ते उपअधीक्षक यांच्यापर्यंतच्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे, परंतु यातीलच अनेकांनी या आगोदर 'फिल्डिंग' लावून पोलिस ठाणे घेतले होते. काही जण तर मंत्रालयात 'फिल्डिंग' लावून आणि 'टेंडर' भरून खास बीडमध्ये आले होते, परंतु पोलिस अधीक्षक म्हणून नवनीत काँवत यांनी पदभार घेतला आणि अनेकांच्या पायाखालची वाळूच सरकली. जे ठाणे हवे म्हणणारेही आता आम्हाला नियंत्रण कक्षात द्या किंवा बदली करा, अशी विनवणी करू लागले आहेत. परंतु, आपण कोणाच्याही बदलीची शिफारस करणार नाही. आहे त्याच अधिकारी, कर्मचाऱ्यांवरच जिल्ह्यात शांतता ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा विश्वास नवनीत यांनी व्यक्त केला आहे.



■ पोलीस अधिकाऱ्यांनो आता फिल्डिंग लावू नका, मेरिट वरच ठाणेदार!

■ बदली होणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या जागी कोण येणार याकडे लागले लक्ष?



### तृप्ती देसाई यांनी सादर केलेले पुरावे महत्त्वाचे ठरणार!



वाल्मिक कराड यांच्या मर्जीतील २६ अधिकारी आणि पोलीस कर्मचारी असल्याचे पुरावे आपल्याकडे असल्याचा दावा सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला होता. त्यांनी ते पुरावे पोलिसांना दिले आहेत. तृप्ती देसाई यांनी बीडमध्ये जाऊन अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडरकर यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी वाल्मिक कराड याच्या निकटवर्तीय २६ पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांविरोधात पुरावे दिले आहेत. त्यांनी यावेळी एक पेन ड्राईव्ह दिला आहे. त्यांनी सादर केलेले पुरावे महत्त्वाचे ठरणार असून याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### एलसीबीत कोण बसणार?

पोलिस निरीक्षक उस्मान शेख यांचीही परळीहून स्थानिक गुन्हे शाखेत बदली झाली. त्यानंतर आ. सुरेश धस यांनी त्यांच्यावर आरोप केले. शेख यांनीही बदलीसाठी अर्ज केला आहे. त्यामुळे आता त्यांच्या जागेवर कोण येणार? याकडे लक्ष लागले आहे. येथे येण्यासाठी अनेक अधिकारी हे थेट मंत्रालयातून 'फिल्डिंग' लावत असतात. परंतु, आता येथे जर मेरिट आणि ज्येष्ठतेचा नियम लागू केला, तर दोन ते तीनच अधिकारी पात्र ठरतात. त्यामुळे या पदाकडेही लक्ष लागले आहे.

### १५ ठाणे होणार रिकामे?

१०७ अधिकाऱ्यांनी विनंती बदल्यांसाठी अर्ज केला आहे. यामध्ये २९ पैकी १५ ठाणेदार आहेत. तसेच, विशेष शाखांचेही प्रभारी अधिकारी आहेत. आता याच ठिकाणी गुणवत्ता असलेल्या अधिकाऱ्यांना नियुक्ती दिली जाणार आहे. पहिल्यांदाच प्रामाणिक अधिकाऱ्यांना 'फुकटात' ठाणेदार होता येणार, असे चित्र पाहायला मिळत आहे.

### खा.बजरंग सोनवणे आणि आ.सुरेश धस यांच्यावर आरोप





बीड जिल्ह्यातील २९ पैकी एका ठाणेदाराने आपल्या विनंती अर्जामधून थेट खा. बजरंग सोनवणे आणि आ. सुरेश धस यांच्यावर आरोप केले आहेत. मतांचे राजकारण साधण्यासाठी काही पण आरोप करत असल्याची टीका त्यांनी यातून केली आहे. तसेच, बीडच नव्हे, तर मराठवाड्याच्या बाहेर आपली बदली करावी, अशी विनंती त्यांनी पोलिस अधीक्षकांमार्फत महासंचालकांना पाठविलेल्या अर्जातून केली आहे. आरोप करणारे ठाणेदार कोण? याची पोलिस दलात सध्या चर्चा सुरू आहे.

### मेरिट पाहूनच नियुक्ती!




विनंती बदलीसाठी अनेकांनी अर्ज केले आहेत, परंतु त्यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल. तर, ठाणेदार बदलण्याची प्रक्रिया ही मे महिन्यात राबविली जाईल. नियुक्ती देताना नाव, चेहरा किंवा शिफारस यांचा विचार केला जाणार नाही. मेरिट पाहूनच त्यांना नियुक्ती दिली जाईल. जर कोणी 'फिल्डिंग' लावली, तर त्यांचा अहवाल तयार केला जाईल.

– नवनीत काँवत, पोलिस अधीक्षक बीड

# धार्मिक स्थळावरून दोन गटात तणाव

## कानोबा देवस्थान आणि मुस्लिमांचे चिल्ला श्रद्धास्थान वादातून गावाला छावणीचे स्वरूप

सिरसाळा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सिरसाळा या गावात काल सोमवार रोजी दोन धार्मिक स्थळावरून मोठा तणाव निर्माण झाला. हिंदू समाजाची कानोबा देवस्थान आणि मुस्लिम समाजाचे श्रद्धास्थान या दोन स्थळांच्या वादातून गावातील वातावरण तापले असून परस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गावात तणावाचे वातावरण निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार. होळीच्या दिवशी कानोबा देवाची काठी हा जल्लोष जुन्या परंपरेने साजरा केला जातो. व गावभर पारपारिक वाद्य गाजत वाजत मिरवणूक काढली जाते. तसेच रंगपंचमीला मढी या ठिकाणी कानिफनाथाची यात्रा भरते. याच उत्सवाचे अवचित ते साधून कानोबा देवस्थानच्या चबुतऱ्याला भगवा रंग देण्यात आला होता. यावरून मुस्लिम समाजाच्या चीला श्रद्धास्थानातील काही लोकांनी आक्षेप घेतला.



या सबुत्र्याला कलर दिल्याने दोन्ही गटामध्ये वाद झाला. या घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून. दोन्ही गटामध्ये संघर्ष होण्याची शक्यता दर्शवली जात आहे. गावातील शांतता राखण्यासाठी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून दोन्ही गटांना शांतता राखण्याचे आव्हान करण्यात आले आहे. या घटनेबाबत अधिक माहिती देताना पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की. आम्ही दोन्ही गटांशी चर्चा करत आहोत आणि त्यांना शांतता राखण्याचे आवाहन करत आहोत. गावातील शांतता आणि कायदा सुव्यवस्था राखणे आमचे प्राधान्य आहे. कानोबा देवस्थान आणि चित्ल्हा श्रद्धास्थान या दोन्ही धार्मिक स्थळांना मोठा इतिहास असल्याचे बोलताना दिसून येत आहे. या दोन्ही स्थळावर दोन्ही समाजातील लोकांची श्रद्धा आहे.

मात्र. काही दिवसापासून या स्थळावरून वाद सुरू झाला होता. या वादातून दोन्ही समाजातील लोकांमध्ये अनेकदा खटके उडले होते. मात्र आज हा वाद एकोपाला गेला आणि तणावाची परिस्थिती निर्माण झाली. पोलिसांनी दोन्ही समाजातील प्रमुख लोकांना बोलून शांतता राखण्याची आव्हान केले आहे. तसेच. धार्मिक स्थळावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या घटनेमुळे शिरसाळा आणि परिसरातील गावामध्ये भीतीचे वातावरण आहे. दोन्ही समाजातील लोकांनी शांतता राखून पोलिसांना सहकार्य करावे, अशी आव्हान प्रशासनाने केले आहे.

## संभाव्य पाणी टंचाई आणि जनावरांच्या सोयीसाठी कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी



माहे मार्च संपत आला असून उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. एप्रिलपर्यंत उन्हाची दाहकता मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. जनावरांसाठी पाण्याची मोठी समस्या निर्माण होऊ लागलेली आहे. त्याचप्रमाणे काही भागातील जलस्त्रोत पातळीही खालावली असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन कन्हेरवाडी लघु सिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी, बीड तसेच गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता यांना पत्र लिहिले असून त्यात म्हटले आहे की, सद्य स्थितीत निर्माण झालेली पाण्याची कमतरता आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे. जेणेकरून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होईल तसेच कन्हेरवाडी गाव, जिरेवाडी, बँक कॉलनी, समता नगर, जलालपूर, शंकर – पार्वती नगर, इंदपवाडी, ब्रह्मवाडी भागातील जलस्त्रोत पातळीत वाढ होऊन याचा नागरिकांना दिलासा मिळणार आहे. करिता आपण या मागणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा आणि योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करून नदीपात्रात पाणी सोडावे अशी मागणी करण्यात आली आहे. संबंधित मागणीचा प्रशासकीय स्तरावर योग्य विचार करून निर्णय घ्यावा अन्यथा लोकाग्रहास्तव लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याची वेळ येईल असाही इशारा त्यांनी दिला आहे.

## अनुभूती व अनुभवाशिवाय शिव महापुराण कळत नाही : प.पू.श्री हरिहरानंद स्वामीजी

### नारी सन्मान महिला मंडळाच्या शिव कथेस पहिल्याच दिवशी भरभरून प्रतिसाद

गेवराई । प्रतिनिधी

ज्यांच्या डोक्यावर शिवाचा हात आहे त्यांच्याच नशिबी शिवपुराण कथा श्रवण करण्याच भाग्य असत महिलांमध्येच माँसाहेब जिजाऊ, अहिल्यादेवी, सावित्रीबाई असे महान व्यक्तिमत्व घडून गेलेले आहेत आणि महिलांचीच संख्या जास्त शिव कथेसाठी असून याच शिव कथेमुळे अनेक व्यक्तिमत्त्व घडतील व अनुभूती आणि अनुभवाशिवाय शिवपुराण कथा कळत नाही. नारी सन्मान महिला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिव कथेमध्ये जे लोक आहेत त्यांना अनुभूती व अनुभव आल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन शिवपुराण कथाकार प.पु. श्री हरिहरानंद भारती स्वामीजी यांनी व्यक्त केले.




या बाबत सविस्तर वृत्त असे की, नारी सन्मान महिला मंडळ व गेवराईतील महिलांच्या वतीने सात दिवसीय भव्य शिवशक्ती संगीतमय श्री शिव महापुराण कथेचे आयोजन श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ दत्तनगर येथे करण्यात आले असून त्याची सुरुवात दिनांक १७ मार्च रोजी करण्यात आली. कथेच्या पहिल्या दिवशी कथाकार प.पु. श्री. हरीहरानंद भारती स्वामीजी यांनी अनेक प्रकारचे उदाहरण देत कथेचे विवचन केले. वडील म्हणजे कुटुंबाचा महादेव असून भोळ्या महादेवा सारखं स्वतःच्या कुटुंबासाठी राबत राहतो असे उद्गार यावेळी वडिलांच्या बाबतीत उपस्थित भाविक भक्तांनसमोर काढले. यावेळी वडिलांची आठवण झाल्याने अनेकांच्या डोळ्यात पाणी आले. स्वामीजी पुढे बोलताना म्हणाले की ज्यांच्या डोक्यावर शिवाचा हात आहे त्यांच्याच नशिबी शिवपुराण कथा श्रवण करण्याच भाग्य असत महिलांमध्येच माँसाहेब जिजाऊ, अहिल्यादेवी, सावित्रीबाई असे महान व्यक्तिमत्व घडून गेलेले आहेत आणि महिलांचीच संख्या जास्त शिव कथेसाठी असून याच शिव कथेमुळे अनेक व्यक्तिमत्त्व घडतील व अनुभूती आणि अनुभवाशिवाय शिवपुराण कथा कळत नाही.

नारी सन्मान महिला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिव कथेमध्ये जे लोक आहेत त्यांना अनुभूती व अनुभव आल्याशिवाय राहणार नाही व तुमच्या जीवनाचा उद्धार झाल्याशिवाय राहणार नाही. पहिल्याच दिवशी हजारो शिवभक्तांनी कथा श्रवणासाठी केलेल्या गर्दीमुळे परिसराला कुंभमेळ्याचे स्वरूप प्राप्त झाले. प.पू. श्री हरिहरानंद भारती स्वामीजी म्हणाले की, जे प्रयागराज येथील महा कुंभमेळ्याला जाऊ शकले नाही त्यांना या कथेमध्येच महाकुंभमेळ्याचे पुण्य मिळणार आहे. त्याच बरोबर सजीवांचे कल्याण करणारे शिवजी आहेत. मेहनती शिवाय फळ नाही, मेहनत करत रहा, मेहनतीला अध्यात्माची जोड दिल्यास आयुष्याचे कल्याण होईल. फक्त लोटाभर जल अर्पण करून शिव प्राप्त होत नाही त्यासाठी सेवा धर्म वाढवा, भाव आणि श्रद्धेने कथा श्रवण करा, निर्मळ मन ठेवा, श्रद्धेने ध्यान करा, शिव प्रसन्न होतील. असे प्रतिपादन शिवपुराण कथाकार प.पु. श्री हरिहरानंद भारती स्वामीजी यांनी व्यक्त केले.

पहिल्या दिवशीच्या कथेची सांगता सौ. विजेता विजयसिंह पंडित, सौ. प्रेरणा प्रताप पंडित यांच्यासह अनेक जोडप्यांच्या हस्ते आरती करून झाली. यासह पहिल्या दिवशीच्या कथेसाठी सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांनी काढलेली शिवलिंग व शिव प्रतीमा रांगोळी भाविक भक्तांचे लक्ष वेधून घेत होती. आरती संपल्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. या पुढील दिवसातील शिवमहापुराण कथेचा जास्तीत जास्त भाविक भक्तांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सौ. शैलाताई मुंडे, सौ. कालींदा अतकरे, सौ. शितल दाभाडे, सौ. शामल ढाकणे, सौ. वैशाली महामुनी, सौ. अर्चना येवले, सौ. नीता बेदरे, सौ. प्रीती दाभाडे व सर्व नारीसन्मान महिला मंडळ गेवराई व गेवराईतील सर्व महिलांच्या वतीने वतीने करण्यात आले आहे.

## केज शहराला बायपास रोड हवा

केज । प्रतिनिधी

केज शहराच्या मध्यवर्ती भागातून खामगाव – पंढरपूर व अहमदपूर – अहिल्यानगर हे महामार्ग जातात.इतरत्र बाजारपेठ नसल्यामुळे शासकीय रुग्णालय, भवानी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शिक्षक कॉलनी या भागात मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला सतत गर्दी झालेली असते. वाहनांची कोंडी होते. शहरात अपघात झाले आहेत. यामुळे यापूर्वी अनेकांना जीवही गममावा लागला आहे. महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांसाठी बायपास रोडची आवश्यकता आहे. बायपास रोड तयार झाल्यास वाहनांची कोंडी होणार नाही तसेच रहदारीचा प्रश्नही सुटेल. अपघातात जाणारे जीव वाचतील. तात्काळ बायपास तयार करावा अशी मागणी केली जात आहे. या दोन्ही मुख्य महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. हे दोन्ही मार्ग शहरात नेहमीच गर्दीने वाहनांची कोंडी झालेले असतात. पादचाऱ्यांना वाहनाने धडकून अनेक वेळा अपघात झाले आहेत. यामुळे वाहतुकीसाठी अधिकचा वेळही लागतो आणि जीवित हानी होत आहे. बाह्यवळण रस्ता तयार झाल्यास कमी वेळेत अधिकचा प्रवास करणे प्रवाशांना शक्य होईल. नेहमी रस्ते जाम होण्याची समस्या सुटणे शक्य होईल.

### लोकप्रतिनिधींचा पुढाकार हवा

खा.रजनीताई पाटील, खा.बजरंग सोनवणे, आमदार नमिता मुंदडा, नगराध्यक्ष सीताताई बनसोड यांनी पुढाकार घेऊन नेहमी



वाहतुकीची कोंडी होत असलेला प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे.

### व्यावसायिकांची मागणी

केज शहरातील शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी यांना या गर्दीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. केज तालुक्याची मुख्य बाजारपेठ आहे. ग्रामीण भागातून शेतकरी, कामगार नोकरदार, व्यावसायिक यांची शहरात नेहमीच गर्दी असते. पंचायत समिती, तहसील कार्यालय, शासकीय रुग्णालय, पोलीस स्टेशन, न्यायालय अशी प्रशासकीय कार्यालये असल्याने त्या कामाने निमित्त येणाऱ्या वाहनधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनाही त्रास सहन करावा लागतो. व्यावसायिकांना तासनतास ताटकळत व्यवसाय बंद ठेवावे लागतात. मुख्य महामार्गा वरची वाहतूक बाह्य मार्गाने वळवावी अशी मागणी केली जात आहे.

## इकरा पठाण या चिमुकलीचा पहिला रोजा पूर्ण

पाटोदा । प्रतिनिधी



मुस्लिम धर्माच्या पवित्र रमजान महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात मुस्लिम समाजातील लहान चिमुकल्यांना वगळून इतर सर्वांना रोजा (फर्ज) सक्तीचे असतात. परंतु घरात पालकांचे पाहून हे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा धरतात. अश्याच प्रकारे पाटोदा येथील युवा नेतृत्व तथा दलित मित्र एकबाल पेंटर फाउंडेशन चे उपाध्यक्ष जुनेद (भैय्या) पठाण यांची लाडकी बहिण चिमुकली इकरा पठाण (वय ७ वर्षे) यांनी तिच्या आयुष्यातील पहिला रोजा काटेकोरपणे पुर्ण केला आहे. दिवससभर अन्नाचा कण व पाण्याचा एक थेंबही न घेता काटेकोरपणे आपल्या आयुष्यातील पहिला रोज यशस्वी पुर्ण केल्याबद्दल तिच्या कुटुंबाच्या वतीने व आजी, आत्या आई, वडिल मामा, मामी भाऊ व सर्व पठाण व मित्र परिवार कडुन इकरा चे कौतुक व अभिनंदन केले आहे.

## टीसी व गुणपत्रक हरवले आहे

कुमार सर्जेराव वाघमारे नावाचा दहावी पास टीसी व गुणपत्रक माने कॉम्प्लेक्स ते के एस के कॉलेज रोड प्रवासामध्ये हरवला आहे कोणाला सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क करा.

८७६७४१८७८७

## खापरवाडीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा चषक खापरवाडी रत्नापूर २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे, दिनांक २० ,३.२०२५ वार गुरुवार रोजी सकाळी नऊ वाजता रत्नापूर या ठिकाणी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे, तरी या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटक जयसिंग भैय्या सोळंके माजी सभापती जिल्हा परिषद बीड यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला पंचक्रोशातील क्रिकेट प्रेमी उपस्थित राहावे, व या क्रिकेट संघातर्फे प्रथम बक्षीस खापरवाडी चे विद्यमान सरपंच सचिन लंगडे व उपसरपंच ऋषिकेश पटाईत यांच्यावतीने ३१ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे.



दुसरे बक्षीस औदुंबर सावंत माजी जिल्हा परिषद सदस्य व आनंद काळे यांच्यावतीने १५ हजाराचे बक्षीस देण्यात येणार आहे, व तिसरे बक्षीस डॉ,गणेश सुरवसे, यांच्यावतीने ७५०० च बक्षीस देण्यात येणार आहे, यामध्ये विशेष सहकार्य बजरंग बप्पा साबळे तालुका अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी, संभाजी तात्या शिंदे सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणी, विश्वास आगे माजी सरपंच देवडी, ज्ञानेश्वर सुरवसे माजी सरपंच देवगाव, गोविंद बादाडे उपसरपंच काडीवडगाव, ईश्वर पटाईत माजी ग्रामपंचायत सदस्य खापरवाडी, नितीन लंगडे, बब्रुवान इतापे सचिव सेवा सहकारी सोसायटी, नितीन गोजे इंडियन आर्मी, रामहरी पटाईत गणेश पॅथॉलॉजी हे पाणी सेवा देणार आहेत, मॅन ऑफ द मॅच, साई राम बॅटरी वडवणी, बेस्ट बॅट्समन मुकुंद लंगडे हर्षद टायर्स माजलगाव, बेस्ट कीपर संग्राम चोरगे संग्राम मल्टी सर्विसेस खापरवाडी, मॅन ऑफ द सिरीज तानाजी आजबे इंजिनियर पंचायत समिती वडवणी, आयुष ट्रेडर्स चे मालक वैभव लंगडे ,बेस्ट बॉलर दादासाहेब गव्हाणे इंडियन आर्मी, यांच्या सर्वांच्या सहकार्याने व आयोजक क्रिकेट प्रेमी कमिटी यांच्यावतीने खापरवाडी रत्नापूर या ठिकाणी भव्य क्रिकेट स्पर्धा मोठ्या प्रमाणात उत्साहात पार पडणार आहे या कार्यक्रमाला या क्रिकेट प्रेमींच्या खेळाला वाव देण्यासाठी परिसरातील क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व क्रिकेट स्पर्धा पाहण्यासाठी मोठ्या संख्येने युवक बांधवांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहण्यात यावे असे आव्हान आयोजक दत्ता पटाईत यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सामाजिक चळवळीतील अग्रेसर असणारा नाव म्हणजे सलीम अध्यक्ष

बीड । प्रतिनिधी

आपण राजकारण करत असताना २०% राजकारण ८० टक्के समाजकारण करायचं असतं ज्याच समाजात आपण जन्मलो त्या समाजाचा काहीतरी देणं आपल्याला असतं ही जिद्द मनात ठेवून नेहमी गोरगरीब वंचित पिढीसाठी लढणारा एक सच्चा समाजसेवक म्हणून सलीम अध्यक्ष यांच्याकडे पाहिले जाते साधी राहणीमान लहानापासून थोरापर्यंत सर्वांमध्ये मिळून मिसळून राहणारा हा चेहरा गोरगरिबांचा दिन दुबळ्यांचा आधार होय सामाजिक कार्य करत असताना कसलाही राजकीय फायदा न घेणारा समाजसेवक होय कोणतीही निवडणूक न लढविता एक इमान ईतबाराने गोरगरिबांच्या सुखदुःखात आधारासारखा उभा राहणारा युवा नेतृत्व म्हणून सलीम अध्यक्ष कडे पाहिले जाते काही व्यक्ती आपले जीवन जगत असताना आपल्या कार्यातून आपली एक वेगळी ओळख निर्माण करतात अशातला



एक नाव म्हणजे सलीम अध्यक्ष हे नाव बीड शहरात मोठा मित्रपरिवार असणारा गोरगरिबांच्या सुखदुःखात कायम उभा राहणारा नाव हे नाव आलं तर रक्तदान शिबिर हे नाव जोडले गेलेले आहे.

समाजाप्रती तळमळ धडपड काहीतरी करून दाखविण्याची जिद्द अशा लोकांना स्वस्त बसू देत नाहीस मोजक्या लोकांना सामाजिक भान आणि समाजातील दुखीत वंचित यांचे दुःख बघून आपला जन्म या लोकांच्या दुखावर फुंकर घालण्यासाठी झालेला आहे ही खूणगाठ मनात बांधून ते अहोरात्र सामाजिक कार्यात तयार असतात असा एकमेव व्यक्ती बीड शहरात आहे ते म्हणजे सलीम अध्यक्ष कुणाचा काहीही काम असो सर्वसामान्य लोकांसाठी तहसील असो की जिल्हा रुग्णालय नेहमी गोरगरिबांसाठी धावणारा एक समाजसेवक म्हणून सलीम अध्यक्ष यांच्याकडे पाहिले जाते बीड जिल्ह्यात रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून रक्तदातांचा आधार म्हणून शेख सलीम अध्यक्ष यांची एक वेगळी ओळख आहे.

२००९ पासून रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून साडेतीन–चार हजार रक्तदातांना रक्तदान देणारा दर्यादिल समाजसेवक सलीम अध्यक्ष होय कोरोना काळात बीड शहरातील गल्लीबोळातील हातावर पोट भरणाऱ्या अनेक गोरगरिबांना अन्नदान किराणा किट तसेच प्रत्येक वर्षी रमजान ईद निमित्त गोरगरीब लोकांना शीरखुर्मा किट वाटप करण्याचा काम ते करत असतात एन आर सी च्या विरोधात केलेल्या आंदोलनात ३६ दिवस समाजासाठी जेल भोगवणारा समाजसेवक होय. राजकारणात काम करत असताना २०% राजकारण ८० टक्के समाजकारण ते करत असतात सर्वसामान्य साठी नेहमी तत्पूर्व असणारा नाव म्हणजे सलीम अध्यक्ष बीड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संदीप भैय्या क्षीरसागर बीड विधानसभेचे मा.आमदार सय्यद सलीम साहेब यांच्या पाठबळावर त्यांचे कार्य चालू आहे दोस्तीच्या दुनियेतला राजा माणूस मनासारखा राजा राजासारखं मन शेख सलीम अध्यक्ष यांचा वाढदिवस १८ मार्च ला होत आहे वाढदिवसानिमित्त त्यांना उदंड आयुष्य लाभो व त्यांच्या हातून समाजकार्या घडत राहो व गोरगरीब वंचित सेवा करत राहो याच वाढदिवसानिमित्त स्वादिच्छा.

# अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राज्यस्तरीय अधिवेशन शेगाव येथे होणार

## मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केले जाहीर



नांदेड । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यस्तरीय बैठकीत संत नगरी शेगाव येथे पुढील राज्यस्तरीय अधिवेशन घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला. या अधिवेशनाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल, अशी घोषणा अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केली.

**मराठी पत्रकार परिषदेच्या ऐतिहासिक वाटचालीवर प्रकाश**

या बैठकीचे उद्घाटन एस. एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी मराठी पत्रकार परिषदेच्या ऐतिहासिक वाटचालीवर प्रकाश टाकत पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या या चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, मराठी पत्रकार परिषद ही केवळ एक संघटना नसून पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणारी चळवळ आहे. पत्रकारांवरील अन्याय, अत्याचार, आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षेसाठी परिषद सातत्याने संघर्ष करत आहे.

**८८६ वर्षांची परंपरा आणि १२००० सभासद**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद ही महाराष्ट्रातील सर्वात जुनी आणि ८६ वर्षांची परंपरा असलेली चळवळ आहे. राज्यभरातील ३६ जिल्ह्यांमध्ये जवळपास १२,००० पत्रकार या परिषदेचे सभासद आहेत. पत्रकारांच्या न्याय आणि अधिकारांसाठी हा लढा अखंडपणे सुरू राहील, असेही देशमुख यांनी स्पष्ट केले.

**पत्रकारांसाठी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी**

यावेळी परिषदचे प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी पत्रकारांसाठी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी केली. पत्रकारांना आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा. पेन्शन योजनेचा लाभ मिळावा यासाठी परिषद सातत्याने प्रयत्नशील राहील, असे त्यांनी सांगितले.

**महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती आणि विचारमंथन**

बैठकीस मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक, विश्वस्त शरद पाबळे, राज्य अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, राज्य सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजीटल मिडीया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, राज्य कार्याध्यक्ष शिवराज काटकर, राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, आदी मान्यवरांनी पत्रकारितेच्या सध्याच्या परिस्थितीवर आणि भविष्यातील आव्हानांवर आपले विचार मांडले.

### नांदेड जिल्हा पत्रकार संघातर्फे सत्कार समारंभ

नांदेड जिल्हा पत्रकार संघातर्फे परिषदेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित पत्रकारांना संघटनेच्या भविष्यातील दिशा आणि उद्दिष्टांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

### पत्रकारांसाठी संघटित संघर्ष आवश्यक – बैठकीचा निष्कर्ष

बैठकीच्या शेवटी एकमुखी निष्कर्ष निघाला की, पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी मराठी पत्रकार परिषद अधिक ठोस भूमिका घेईल. शासनदरबारी पत्रकारांच्या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. परिषदेचे अस्तित्व टिकवणे ही केवळ जबाबदारी नसून पत्रकारांसाठी जीवनमरणाचा प्रश्न आहे, असे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले. सर्व उपस्थित पत्रकारांनी परिषदेच्या संघर्षात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

बैठकीला कार्यकारिणीचे राज्य पदाधिकारी, उपाध्यक्ष, विभागीय सचिव, जिल्हाध्यक्ष, परिषद प्रतिनिधी, अधिस्वीकृती समिती सदस्य, डिजिटल मीडिया, महिला आघाडी सह राज्यभरातून २७ जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र गित विजय जोशी यांनी सादर केले. संचलन परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुरेश नाईकवाडे यांनी केले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष संतोष पंडागळे यांनी केले. तर बैठक यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष संतोष पंडागळे, राज्य उपाध्यक्ष प्रकाश कांबळे यांच्या नियोजनाखाली कोअर कमिटी आणि इतर सर्व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.

# खंडपीठाच्या आदेशाची पायमल्ली; जि.प. आरोग्य विभागाचा गलथान कारभार



केज । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाअंतर्गत ५० टक्के आरोग्य सेवक हंगामी फवारणी क्षेत्र पुरुष कर्मचारी यांच्या भरावयाच्या १०४ जागे साठी जिल्हा परिषदेच्या वतीने वर्तमान पत्रात जाहिरात देणे, परीक्षा घेणे, गुणवत्ता यादी जाहीर करणे, कागदपत्राची पडताळणी करणे अशी प्रक्रिया सप्टेंबर २०२४ अखेर पूर्ण होऊनही पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली नव्हती. त्यामुळे या प्रकरणी औरंगाबाद खंडपीठात सुनावणी होऊन हे पद आरोग्याशी निगडित असल्याने तात्काळ कार्यवाही करावी असा आदेश दहा दिवसापूर्वी बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ यांना देऊनही १०४ आरोग्य कर्मचाऱ्या च्या नियुक्तीच्या अध्याप ही हालचाली सुरु करण्यात आलेल्या नाहीत. पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात यावेत अशी मागणी निवड झालेल्या आरोग्य सेवक कर्मचाऱ्या कडुन होत आहे.

या भरती प्रक्रियेचा निकाल सहा महिन्यापूर्वी लागूनही आणि औरंगाबाद खंडपीठाने दि.७ मार्च २०२५ रोजी बीड येथील मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांना आदेश देऊनही व ग्रामविकास विभागाच्या अवर सचिव सुप्रिया घोटाळे यांनी दि.१२ मार्च २०२५ रोजी आवश्यक कारवाई करावी असे आदेश संबंधितांना दिलेले आहेत. तरीही या प्रकरणी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवणे व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांनी ५० टक्के आरोग्य सेवक कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश दिलेले नाहीत. हे आदेश पात्र कर्मचाऱ्यांना तात्काळ देण्यात यावेत अशी मागणी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांतुन होत आहे.

### पात्र कर्मचारी मानसिक व आर्थिक विवंचनेत

बीड जिल्ह्यातून ५० टक्के आरोग्य सेवक कर्मचारी पदासाठी पात्र ठरलेले १०४ आरोग्य कर्मचारी यांनी निवडसात महिन्यापूर्वी होऊनही त्यांना अद्याप नियुक्तीचे आदेश मिळालेले नाहीत. त्यामुळे हे सर्वजण मानसिक व आर्थिक विवंचनेत सापडले आहेत.

### सत्यता पडताळणी होताच नियुक्ती देणार

या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांचेशी संपर्क साधला असता पात्र आरोग्य कर्मचाऱ्यां च्या फवारणी प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी होणे बाकी आहे. ही पडताळणी पूर्ण होताच पुढील आठवड्यात पात्र आरोग्य कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश देण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.

# मोटार वाहन अपघाताचे खोटे गुन्हे दाखल केले असून ते मागे घेऊन फसवणुकीचा गुन्हा दाखल करा

### मौला इस्माईल खुरेशी, युसूफ वडगाव पोलीस स्टेशनचा अजब गजब कारभार

### बीट अंमलदार यांनी संगमत करून केले खोटे गुन्हे दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील मौला इस्माईल कुरेशी यांनी जिल्हाधिकरी यांच्याकडे तक्रारव्दारे लिखित स्वरूपात दिली. दि.०१/०१/२०२५ रोजी मी कच्ची केळी कळंब ते माजलगाव कडे जात असताना एक स्कूटर एमएच१३ बीएम१०७२ आयशरला ओव्हरटेक करित समोर अजून एक ऊसाचा ट्रॅक्टर ओव्हरटेक करित माझ्या समोर येऊन धडकला मी वाहन उभा करून मदत करणार परंतु त्याठिकाणी काही लोक चल करुन माझ्या दिशेने येत होते. नंतर मी माझे वाहन घटना स्थळ पासून कमी कमी १० ते१५ किलोमीटर अंतरावर सोडून शेतात जाऊन लपलो नंतर मी माझ्या गावाकडे गेलो आणि दुसऱ्या दिवशीही मी पोलिस स्टेशन मध्ये हजर होऊन सर्व घटना तोंडी सांगितली.

त्याठिकाणी बीट अंमलदार यांनी सांगितले की तुम्हाच बरोबर आहे मी त्याठिकाणी माहिती घेऊन तुमचे वाहन संबंधित पोलिस स्टेशन जमा केले आहे त्याठिकाणी वाहन व सर्व माहिती घेतली असून तुम्ही मला ५००० रुपये देऊन आज गाडीखाली करून केळी घेऊन जा नाही तर खराब होईल असे सांगितले ठिक आहे सर पण माझी चुक नाही आपणास सर्व माहिती आहे मग पैसे का बीट अंमलदार यांनी सांगितले. मामु दिल्या शिवाय काम होत नाही नंतर मी २००० रुपये दिले माझी गाडीतील केळी दुसऱ्या गाडीत खाली करून माजलगाव पाठविण्यात आली त्याचं दिवशी मी अंबाजोगाई रुग्णालयात गेलोय त्याठिकाणी नातेवाईकांशी भेट घेऊन पेशंट विचार पुस केली मला सांगितले की आमच्या पेशंट यांनी आती दारू पिऊन आहे त्यांचे तोंड सुजलेले असून आम्हाला माहिती आहे कोणाची चुक आहे तुम्ही मामु टेंशन घेऊ नका आमची तुमच्या वर कोणीही गुन्हे दाखल करणार नाही तुम्ही तुमचे वाहन पोलिसांना सांगून सोडून घेऊन जा असे सांगितले नंतर मी दि, १०/०१/२०२५ रोजी पोलिस स्टेशन मध्ये जाऊन बीट अंमलदार यांना सांगितले त्यांनी पण तेच सांगितले तुम्ही तुमचे वाहन घेऊन जा परंतु तुमाला पैसे देऊन च तुम्हाचे वाहन सोडले जाईल ३०००० रुपये मागणी केली नाही दिले तर तुमच्या वर गुन्हा दाखल होईल मी फिर्यादीला सांगून तुमच्या वर केस होऊ देत नाही नंतर मी तोडजोड करुन १५००० रुपये देण्याचे सांगितले माझ्या कडे फक्त १०००० रुपये आहेत ते १०००० रुपये दिले नंतर पोलिस स्टेशन बाहेर आल्यावर ५००० रुपये देऊन त्याठिकाणी वाहन पोलिस स्टेशन मधुन बाहेर काढले परंतु नंतर मला फोन वर सांगितले की आपण दि.२३/०१/२०२५ रोजी तुमच्या वर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झाला असून आपण पाचशे रुपये चा बोंड पेपर घेऊन या असे कळविण्यात आले आहे.

तुम्ही कांहीच टेंशन घेऊ नका तुम्ही जेवढं सांगितले तेवढंच करा असे बोलून फोन कट केला आहे त्या नतंर मी पोलिस स्टेशन मध्ये बोर्ड पेपर घेऊन गेले तसेच त्याठिकाणी असे कळाले की संबंधित फिर्यादी ला दि.१७/०१/२०२५ रोजी आंबेजोगाई येथील सरकारी रुग्णालयातून सुट्टी मिळाली होती त्यानंतर त्यांनी संगमत करून दि.२१/०१/२०२५ रोजी माझ्या वर खोटे गुन्हे दाखल केले आणि पेशंटचा जवाब न घेता त्याच्या घरच्या महिला फिर्यादी करुन गुन्हे दाखल करण्यात आली. हि घटना खरी असून मला न्याय देण्यात यावे. फिर्यादीचा मेडिकल रिपोर्ट काढण्यात यावे. फिर्यादी यांनी इन्शुरन्स पैसे उकळण्यासठी बीट अंमलदार व फिर्यादी संगमत करुन खोट गुन्हे दाखल केले ते मागे घेण्यात यावे, बीट अंमलदार व फिर्यादी याच्या वर फसवणूक चा गुन्हा दाखल करण्यात यावे, योग्य न्याय देऊन संबंधित फिर्यादी व संगनमत करुन माझ्या कडून पैसे काढण्यासाठी माझ्या वर खोटे गुन्हे दाखल केले असून ते मागे घेऊन फसवणूक चा गुन्हा दाखल करण्यात यावे व फिर्यादीचा मेडिकल रिपोर्ट आणि ज्याठिकाणी अपघात झाला त्याठिकाणी ची सर्व माहिती घेऊन योग्य कारवाई करण्यात यावी. तसेच बीट अंमलदार व काही पोलिसांनी माझ्या कडून पैसे घेतले आहे त्यांचे विडिओ माझ्या कडे उपलब्ध असून त्यांच्या वर खंडणी चा गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच फिर्यादी यांनी संगमत करून खोटे गुन्हे दाखल केले ते मागे घेण्यात यावे.हि खरा जवाब असून अश्या प्रकारे खोटे गुन्हे दाखल होत असून त्यामुळे सर्व सामान्य अर्थक त्रास होत आहे याची दाखल घेऊन तात्काळ चौकशी करुण खरी माहिती घेण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांना मौला इस्माईल कुरेशी केली आहे.

# विशाल परदेशी यांची मराठी पत्रकार परिषदेच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती



मुंबई । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या उपाध्यक्षपदी न्यूज १८ लोकमतचे प्रसिध्द अँकर विशाल परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई विभागाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर यांनी काल नांदेड येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीनंतर ही घोषणा केली.

विशाल परदेशी हे गेली काही वर्षे परिषदेशी जोडलेले आहेत. मुंबई शाखेचे पदाधिकारी म्हणूनही ते कार्यरत होते. त्यांच्यावर आता राज्य उपाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पुढील दोन वर्षे ते उपाध्यक्ष म्हणून काम पाहतील. एस.एम.देशमुख, विश्वस्त किरण नाईक, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी विशाल परदेशी यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# दारव्हा येथे नारीशक्ती सन्मान सोहळा संपन्न



केज । प्रतिनिधी

दारव्हा येथे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषद द्वारा जागतिक महीला दिनाच्या निमित्ताने नारी शक्ती सन्मान व कोष्टी समाज मेळावा संपन्न झाला. यावेळी कर्तृत्ववान महिला हा पुरस्कार विद्याताई तारळकर यांना यवतमाळ दारव्हा येथे प्रदान करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अखित महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान व गौरव करण्यात आला.

यावेळी प्रमुखउपस्थिती जगत्गुरु श्री श्री श्री दयानंदपुरी महास्वामीजी पिठाधिश, गायत्रीपीठ हम्पी हेमकुट, कर्नाटक हे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये ना.संजयभाऊ राठोड मंत्री, मृद व जलसंधारण तथा पालकमंत्री यवतमाळ हे होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष, देवांग, देवांगण, कोष्टी, कोष्ठा फेडरेशनचे अध्यक्ष श्री.अरुणरावजी वरोडे, महिला प्रदेश अध्यक्ष सौ मंदाकिनीताई टकले, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री. सतिशराव दाभाडे, श्री.पंडितराव विधाते, श्री.विष्णूभाऊ कुटे, अध्यक्ष सौ.शैलाताई लोळे, श्री.संजय दादा नवले, श्री.घटे सर, श्री. अशोक अलोने, कोष्टी समाजाचे बीड जिल्हाध्यक्ष श्री.सुरेशराव असलेकर, श्री.बाळासाहेब गलांडे, एसबीसी संघर्ष नेते श्री.बालाजी चिनके, श्री. बाळासाहेब दिवटे, श्रीमती मीरा वीर, मुख्य संयोजक श्री.सतिशराव सपाटे व कार्यक्रमास उपस्थित कोष्टी समाजातील राजकीय, सामजिक आणि विविध क्षेत्रातील लोक कार्यक्रमाला उपस्थित होते.

यावेळी सत्काराला उत्तर देताना विद्याताई तारळकर यांनी सांगितले की, आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण जो नारिशक्ती म्हणून माझा सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन माझा यथोचीत सन्मान केला त्यामुळे आम्हाला सामाजिक, धार्मिक क्षेत्रात काम करण्यास आणखीन बळ व आगळी वेगळी ऊर्जा मिळाली आहे त्या बद्दल मी सर्वांना धन्यवाद देते. समाजाने पाठीशी कौतुकाने थाप दिली त्यामुळे माझी जबाबदारी वाढली आहे असे त्यांनी सांगितले. आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# पिडीत कंत्राटी सफाई कामगारांना न्याय मिळवुन देण्यासाठी अन्नत्याग उपोषण करणार : आगळे, जोगदंड

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मागील २० महिने झाले कंत्राटी सफाई कामगारांना कामावरून पुर्व सुचना न देता मुख्याधिकारी निता अंधारे मॅडम यांनी कामा वरुन कमी केले आहे. कामगारांना कामावर रुजु करून घ्यावे या प्रमुख व ईतर मागण्यासाठी केंद्रिय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वात सोमवार दि. २४ मार्च २०२५ सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड अन्नत्याग उपोषणास सुरुवात करणार असल्याचे निवेदन राज्याचे अर्थमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी कार्यालय बीड मार्फत निवेदन सादर केल्याची माहिती रोजंदारी मजदुर सेना केंद्रिय महासचिव तथा कामगार नेते भाई गौतम आगळे, मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

कंत्राटी सफाई कामगारांच्या न्याय हक्क सोई सुविधा प्राप्त व्हाव्या म्हणुन सनदशीर कायदेशीर मार्गाचा अवलंब करत धरणे निदर्शने दरम्यान





महिला कामगारांना सलग आठ दिवस कारागृहात डांबुन ठेवण्यात आले. राजेशकुमार जोगदंड यांनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर सलग १८ दिवस अन्नत्याग उपोषण केले परंतु आर्थिक निधीचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवल्याचे पत्र देत आंदोलनकर्त्यांची फसवणुक झाली असल्याचे कळवले आहे, आजपर्यंत बीड येथील कंत्राटी सफाई कामागारांना कामावर न घेता बेरोजगार केले, त्यांच्या कौटुंबीक आर्थिक अवस्था अत्यंत हलाखीच्या झाल्या आहेत तर दुसरी बाजु अशी कि, कचरा साफ सफाई करणारे अपुरे कर्मचारी आहेत आणी जर त्या कामगारांनी गटारातील गाळ कचऱ्याची विल्हेवाट लावली नाही तर स्वच्छता कर्मचारीच अपुरे आहेत असे कारण बीड नगर परीषद सांगत आहे परीणामी नागरीकांचे अबाल वृद्धांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे जनतेनेच स्वच्छतेबाबत जाब विचारावा असे आवाहन भाई गौतम आगळे सर यांनी केले आहे. तर दुसरीकडे आपण स्वच्छ भाजीपाला किंवा ईतर वान खरेदीसाठी बाजारात जातो तिथे विक्रेत्याला अस्वच्छतेचा सामना करावा लागत आहे.

कर वसुलीचे जाहिर लिलाव मुख्याधिकारी न.प. बीड आदेशीत करु शकतात परंतु शहरातील स्वच्छता अबाधित राहावी म्हणुन घनकचरा व्यवस्थापन माध्यमातुन स्वच्छतेसाठी निविदा जाहीर करुन शकत नाही. कंत्राटी सफाई कामगारांसहीत नागरीकांच्या आरोग्याशी बीड नगर परीषद द्वेष भावनेतुन क्रुर खेळ खेळत आहे. कारण कंत्राटी सफाई कामगारांना पुर्ववत कामावर रूजु करुन घ्यावे लागेल, म्हणुन निधीचे कारण पुढे करत न्यायासाठी कायदेशीर मार्गाने संघटनेच्या माध्यमातुन संघर्ष करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना २० महिन्यां पासुन बेरोजगार केले आहे. कंत्राटी सफाई कामगारांना जो पर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत संघटनेच्या माध्यमातुन संघर्ष करणार असे अन्नत्याग उपोषणकर्ते भाई राजेशकुमार जोगदंड यांनी सुतोवाच केले आहे. जिल्ह्यांतील सर्व कंत्राटी कामगारांना हजेरी वेतन कार्ड (नियम २७) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी ची पावती व इतर सर्व सुविधा तात्काळ देण्यात याव्यात.

कामगार विभागाच्या वतीने कार्यरत कंत्राटदार जर कामगार कायदे पाळत नसतील तर त्यांच्यावर फौजदारी खटले दाखल करून त्यांना काळ्या यादीत टाकावे अन्यथा सोमवार दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड अन्नत्याग उपोषण करतील असा इशारा दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सदरील निवेदन संबंधित मंत्री महोदय व सनदी अधिकारी यांना ईमेल करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर, मराठवाडा अध्यक्ष भाई राजेश कुमार जोगदंड यांनी एका संयुक्त प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

# कोमलवाडी गावात राजकारणाचा ढिगारा



## तरूणांनो उघडा डोळे बघा नीट, पुढाऱ्यांना करा नीट ?

**आडे-मुद्दा क्रॉस**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागात असलेल्या कोमलवाडी या छोट्याशा गावात राजकारणाचा ढिगारा पाहायला मिळत आहे. तसेच कोमलवाडी गाव हे सुशिक्षित म्हणून ओळख जात आहे. याचा सार्थ अभिमान आहे कारण या गावात बहुतांश लोक हे शासकीय सेवेत रूजू आहेत. यामुळे कोमलवाडी सारख्या या छोट्याशा गावाची ओळख तालुका भर आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीत या गावात समाजकारण कमी आणि राजकारण जास्त चालू असल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच कोमलवाडी गावाची लोकसंख्या जवळपास सहाशे ते सातशे आहे. परंतु राजकारणात जास्त सक्रिय असल्याने कोमलवाडी गाव हे राजकारणाच्या भोवऱ्यात सापडला आहे. सध्याच्या परिस्थितीत गावपातळीवरील पुढार्यांना आमदार झाल्यासारखं वाटतंय? गावातील समस्या सोडवण्यासाठी गाव पुढारी अपयश ठरत असून फक्त स्वतःची छाप कशी पडेल या पार्श्वभूमीवर गावात राजकारण केले जात आहे. अशा परिस्थिती निर्माण झाल्याने काही सुज्ञ विचाराचे नागरिक नाराज होताना दिसत आहे.

कोमलवाडी गाव हे छोटसं असून यामध्ये राष्ट्रवादी, शिवसेना, भाजप या तिन्ही पक्षाचे गाव पुढारी व कार्यकर्ते आहेत. यामुळे मी भारी, आपला पक्ष भारी, आपला नेता भारी अशी परिस्थिती सध्याच्या काळात पहायला मिळत आहे. गावाच्या विकासासाठी राजकारण न करता विकासच करून घेणे हे योग्य असताना. तसेच आपल्या गावाचा विकास कसा होईल, आपल्या गावाचे नाव उज्वल कसे करता येईल, यासाठी सध्याच्या काळात गाव पुढारी प्रयत्न करताना दिसत नाही. राजकारणाच्या माध्यमातून खेळी खेळल्या सारखे मी या पक्षाचा कार्यकर्ता, मी या नेत्याचा कार्यकर्ता, असे राजकारण करताना दिसत आहे.

काही ठरावीक लोकांच्या हातात सत्ता असते. ज्यांच्याकडे सत्ता असते ते लोक इतरांपर्यंत माहिती पोहचू देत नाहीत. ज्याला राजकारणाची व्याख्या कळत नाही तो म्हणतोय मी ह्या पक्षाचा कार्यकर्ता आहे माझा नेता माझ्या पाठीशी आहे. गावागावांत वेगवेगळे परस्परविरोधी राजकीय विचारांचे पक्ष काम करतात. त्यामुळे तिथेही राजकीय सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष असे कुरू घोडीचे राजकारण सुरू सातत्याने असते. त्यामुळे एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विकास कामाचा कार्यक्रम आखला की त्या कार्यक्रमात खोड कशी घालायची आणि ते कार्यक्रम कसा बिघडवायचा यात स्थानिक चे पुढारी आणि त्यांचे बगलबच्चे असा कळीचा मुद्दा करून बाजूला होतात. होणारे काम बिघडवतात गावातील महिला बचत गट हेदेखील नावापुरते राहिले आहे. पाच वर्षांचा काळ हा एकमेकांना दोष देण्यात व विरोध करण्यात एकमेकांचे पाय खेचण्यात वाया घालवणारी ही लोक आहेत. गावात वाद विवाद झाला तर तो आपल्या पक्षाचा माणूस नाही. आपला कार्यकर्ता नाही. असे म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. अशा पद्धतीने वादात राजकारण घातले जाते. हे दुर्दैव तुझे माझे जमेना, तुझ्या वाचून करमेना, असाच गावाचा विकास कासवाच्या गतीने चाललेला हा विकास कामाचा निधी पूर्ण थांबतो. त्यामुळे गावाचा विकासनिधी परत करावा लागतो स्थानिक गाव पातळीच्या या पुढार्यांमुळे एकमेकांच्या जिरवा जिरवीत यशस्वी ठरण्यात ते सातत्याने माहीर असतात. मीच आहे गावचा कारभारी मी कुठलीही गोष्ट करतो लयभारी अशा तोऱ्यांत वागणारे पांढरे शुभ्र इस्तरी चे कपडे, राहणीमान कडक, अशा रुबाबात राहणारे गावचे स्वयंघोषित पुढारी गावच्या विकासासाठी मात्र शून्यसर्व ठरले आहे. राजकारणाच्या दोषीतून गावाच्या विकासाबाबत आडकाठ्या आणण्याचे काम गाव पुढारी करतात. आणि कुठले काम दर्जेदार होत असेल तर ते काम निकृष्ट दर्जाचे आहे. असा कांगावा करण्यासाठी ते पुढे येतात. परंतु गावाच्या विकासाबाबत होणारे चांगल्या कामाचे कौतुक ते अजिबात करत नाहीत हे निंदनीय आहे. काही लोक तर मीच आहे सत्तेचा भाई तोच करतो अनेकांची घाई-घाई अशा आडमुठ्या धोरणामुळे गावाच्या विकासाचा बोऱ्या वाजलाय पण एकही सुज्ञ नागरिक आवाज उठवत नाही. आणि गावचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न करत नाहीत आता तरी तरुणांनो जागे व्हा आपल्या कोमलवाडी गावाच्या विकासासाठी पुढे या!

# चाळण झालेल्या प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नाही मात्र चांगल्या रस्त्यावरच दुबार काम



## नगरपालिकेचा मनमानी कारभार; सोमवारी आंदोलनाचा इशारा

बीड | प्रतिनिधी

बीड शहरातील अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने शहरातील बहुतांश रस्त्याची चाळण झालेली आहे. त्यामुळे वाहनचालकांना मुठीत जीव घेऊन कसरत करत वाहन चालवावे लागते. शहरातील सर्वाधिक वर्दळीचा असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज रस्त्याची पुर्ण चाळण झालेली आहे. या रस्त्यावर खड्डे, वाळु, वाळु मिश्रित खडी, असल्याने धुराळा उडत असुन नागरीकांना श्वसनाचे आजार जडण्याचा धोका आहे. या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरीकांनी वारंवार नगरपरिषद प्रशासनाला केलेली आहे.

मात्र नगरपरिषद प्रशासन दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे रडगाणे गात आहे. मात्र याचवेळी प्रमुख रहदारीच्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्या ऐवजी नगरपालिकेने नगरपालिका कार्यालयासमोरील केवळ नगरपालिकेत येणाऱ्या वाहनांची वर्दळ असणाऱ्या आणि रस्त्यावर कुठेही खड्डे नसताना चांगल्या सुस्थितीत असलेल्या सिमेंट रस्त्यावरच पुन्हा दुबार सिमेंट रस्त्याचे काम केले आहे. त्यामुळे एकंदरीतच प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी निधी नसल्याचे कारण सांगणाऱ्या नगरपालिका प्रशासनाने चांगल्या रस्त्यावरच दुबार रस्ता करून जनतेच्या पैशाची उधळपट्टी का केली? हा प्रकार ठेकेदारांचे खिसे भरण्याचा प्रकार असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असून मुख्य रस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजविण्यात यावेत या मागणीसाठी सोमवारी या प्रकरणी नगरपरिषद कार्यालयावर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



# परळी शहर पोलिसांनी गुटखा पकडला

परळी | प्रतिनिधी

परळी शहर पोलीस ठाणे हद्दीमध्ये आज रोजी पोलीस स्टाफ पेट्रोलिंग करत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की एक इसम स्विफ्ट डिझायर गाडीमध्ये गुटखा विक्रीसाठी घेऊन परळी मध्ये येणार आहे. मिळालेल्या माहितीवरून सदर वाहनाचा शोध घेता, संशयितरित्या एक स्विफ्ट डिझायर गाडी दिसून आली, सदर गाडीची दोन पंचा समक्ष झडती घेता सदर गाडीमध्ये पांढरे गोण्यात गुटख्या सारखा माल दिसून आल्याने सदर वाहन पोलीस ठाणे येथे आणून पंचा समक्ष वाहनाची झडती घेता सदर गाडीमध्ये पांढऱ्या गोण्या भरलेला एम आर डी व तंबाखूजन्य पदार्थ ,गुटखा असा एकूण एक १,२३ ३६० रुपयाचा मुद्देमाल व स्विफ्ट डिझायर गाडी ५,५०,०००/- असा एकूण ६,७३,३६०/- रू चा माल आरोपी गजानन नारायण मनाळे, रा. जलालपुर याचे ताब्यात मिळून आलेला आहे. सदर मुद्देमाल सविस्तर पंचनामा करून पुढील कायदेशीर कारवाई पोलीस स्टेशन परळी शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत सर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल सर, पोनि. रघुनाथ, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी योगेश व, पो अंम. गोविंद, गोविंद, मस्के, किशोर, पंडित तसेच स्टाफ. यांनी केली असुन गुन्हा दाखल करून पुढील तपास सूरु आहे.

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

गेवराई | प्रतिनिधी

आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित



यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

# रमाई घरकुल योजनेचा निधी अडीच लाखहुन पाच लाख करावा : मुळूक

बीड | प्रतिनिधी

राज्य शासनाच्या माता रमाई घरकुल आवास योजनेतील लाभार्थ्यांना अडीच लाख रुपये अनुदान देण्यात येते. मात्र वाढत्या महागाईमुळे हे अनुदान अपुरे असल्याने यात वाढ करून ते पाच लाख रुपये करावे अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांच्याकडे केली आहे. रमाई योजनेचा निधी वाढविण्यासंदर्भात सरकार सकारात्मक असल्याचे सिरसाट यांनी सांगितले असे मुळूक म्हणाले. यावेळी सोबत संभाजीनगर जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ उपस्थित होते.

राज्यात महानगरपालिका व नगरपालिका हद्दीत माता रमाई घरकुल आवास योजनेचे लाभार्थी मोठ्या प्रमाणात आहे. लाभार्थी हे गरीब कष्टकरी व रोजंदारीवर काम करणारा वर्ग आहे. योजनेचे मिळणारे अडीच लाख अनुदान हे घर बांधण्यासाठी अपुरे पडत आहे. आजघडीला महागाई वाढली असून घर बांधकामासाठी लागणारे साहित्याचे दर वाढले असल्याने अडीच लाखांमध्ये घरकुलाचे पूर्ण बांधकाम होत नाही. या अनुदानाची रक्कम वाढवून याची मर्यादा ५ लाख केल्यास लाभार्थ्यांना लवकरात लवकर घर पूर्ण बांधकाम करण्यात मदत होऊन त्यांचे स्वप्न साकार होईल. यामुळे रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना मिळणारे अनुदान वाढवून पाच लाख रुपये करण्यात यावे, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ व इतर मागासवर्ग महामंडळाना मिळणारे अनुदान वाढवून या महामंडळासाठी भरीव निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली आहे. या संदर्भात मुळूक यांनी जिल्ह्याचे संपर्क मंत्री तथा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांची भेट घेतली. यावेळी सोबत संभाजीनगरचे जिल्हाप्रमुख राजेंद्रजी जंजाळ उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची कामे आडवाल तर गाठ माझ्याशी

## शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बदामराव पंडित आक्रमक; कर्मचाऱ्यांना झापले

गेवराई | प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी शासनाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांमध्ये राजकारण करत गेवराई पंचायत समिती मधील अधिकारी व कर्मचारी आडवा आडवीचे काम करत असल्याची माहिती मिळताच, शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित हे आक्रमक झाले. त्यांनी थेट पंचायत समिती कार्यालय गाठून तेथील अधिकारी व कर्मचारी यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चांगलेच धारेवर धरले. माझ्या नावाने अपप्रचार करून शेतकऱ्यांच्या कामात आडवा आडवी कराल तर गाठ माझ्याशी आहे असा सज्जड दमही त्यांनी दिला. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

गेवराई पंचायत समिती अंतर्गत शासनाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक योजनांमध्ये आडवा आडवी केली जात



असल्याच्या तक्रारी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्याकडे आल्या होत्या. त्यातच मनरेगा अंतर्गत कामामध्येही अनेक ठिकाणी अनियमित्ता झाल्याच्याही तक्रारी मिळाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेवराई पंचायत समितीला ५ मार्च रोजी एका निवेदनाद्वारे सात ग्रामपंचायतच्या २०२२ ते २०२४ या दोन वर्षातील नरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांच्या संचिका देण्याची मागणी केली होती. मात्र दहा दिवस उलटून गेले तरी सदर संचिका बदामराव पंडित यांना देण्यात आल्या नाही याउलट पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी आणि कर्मचारी यांनी बदामराव पंडित यांनी तक्रार केल्याने, नरेगा अंतर्गत सुरू असलेली आणि नवीन कामे बंद करण्यात येत असल्याचे लाभार्थ्यांना सांगितले होते. यामुळे संतप्त झालेल्या बदामराव पंडित यांनी थेट गेवराई पंचायत समिती कार्यालय गाठले. आपण ज्या ग्रामपंचायतच्या संचिका मागितल्या त्या ४८ तासात मला मिळाल्या पाहिजेत, त्यासोबतच नरेगा अंतर्गत सुरू असलेली सर्व कामे सुरू ठेऊन तत्काळ मस्टर चालू करा. वैयक्तिक लाभाच्या विहिरी, शेततळे, गायगोठा या योजनाचा लाभ योग्य शेतकऱ्यांना तात्काळ द्या, अशी मागणी करून कोणत्याही कामात राजकारण केल्यास माझ्याशी गाठ आहे असेही बदामराव पंडित यांनी ठणकावले.

यावेळी गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांच्यासह पंचायत समिती स्तरावरील विविध विभागाचे प्रमुख अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. बदामराव पंडित पंचायत समितीमध्ये आल्याचे समजताच शेतकरी आणि शिवसैनिकांनी पंचायत समिती परिसरात मोठी गर्दी केली होती.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT